**<u>किरकोळ दिवाणी अर्ज नं.१६१/२०१९ मधील नि.३० वरील आदेश</u>**
**<u>(अनिल गणपती शिंदे वगैरे विरुध्द कोणी नाही)</u>**
**<u>CNR No:MHSN02002078-2019</u>**

१. ति-हाईत इसम क्र.१ ते १२ यांनी त्यांना अर्जामध्ये जाबदारपणात सामील करुन घेणेकरीता दिवाणी प्रक्रिया संहिता क्रम १ नियम १० व दिवाणी प्रक्रिया संहिता क्रम ६ नियम १७ प्रमाणे प्रस्तुतचा अर्ज दाखल केला आहे.

२. ति-हाईत इसम यांचे कथन थोडक्यात खालीलप्रमाणे-

अर्जदार यांनी मुळ अर्ज भारतीय वारसा कायदा १९२५ मधील कलम २७८ प्रमाणे लेटर ऑफ ॲडमिनिस्ट्रेशन मिळणेसाठी दाखल केलेला आहे. ति-हाईत इसम यांच्या म्हणण्याप्रमाणे ते मुळ अर्जात नमूद केलेल्या तक्रार विषयी मिळकतीचे कब्जेदार वहीवाटदार आहेत. परंतु सदरहु मिळकती संदर्भात मृत्यूपत्र करुन देणार व्यक्ती यांनी मृत्यूपत्रात नमूद केलेली मिळकत एकटयाची आहे असे गृहीत धरुन वादग्रस्त मृत्यूपत्र करुन दिलेले होते व आहे.

३. ति-हाईत इसम यांच्या म्हणण्याप्रमाणे ज्या मृत्यूपत्राला अनुसरुन प्रस्तुतचा अर्ज अर्जदार यांनी दाखल केलेला आहे. त्या मृत्यूपत्रामध्ये समाविष्ठ असणा-या मिळकतींमध्ये त्रयस्थ इसम यांचे हक्क व अधिकार आहेत. त्यामुळे जर त्रयस्थ इसम यांना मुळ अर्जामध्ये पक्षकार केले गेले नाही तर त्यांचे हक्क डावलण्यासारखे होणार आहे. त्यामुळे त्रयस्थ इसम यांना मुळ अर्जात सामनेवाला म्हणून सामील करुन त्यांना पुरावा देण्याची संधी देण्यात यावी अशी मागणी प्रस्तुत अर्जाद्वारे ति-हाईत इसम यांनी केलेली आहे.

४. सदरहु अर्जाला अनुसरुन अर्जदार यांनी त्यांचे म्हणणे नि.क्र.२९ कडे दाखल केलेले आहे. त्यांच्या म्हणण्याप्रमाणे ति-हाईत इसम यांना अर्जात नमूद केलेल्या मिळकतीमध्ये कशाप्रकारे हिस्सा येतो याचे स्पष्टीकरण दिल्याखेरीज त्यांना अर्जात सामनेवाला म्हणून सामील करता येणार नाही असे प्रतिपादन करुन अर्जदार यांनी त्रयस्थ इसम यांचा अर्ज फेटाळण्याची मागणी केली आहे.

५. सदरहु अर्जाला अनुसरुन मुळ अर्जाचे अवलोकन केले. ति-हाईत इसम यांनी नि.क्र.३३ कडील कागदयादीसोबत दाखल केलेल्या कागदपत्रांचे अवलोकन केले.

मुळ अर्ज हा दिनांक १५/०८/२००३ रोजी कै. तुकाराम शिंदे यांनी जे मृत्यूपत्र करुन ठेवलेले होते त्याला अनुसरुन लेटर ऑफ अ‍ॅडमिनिस्ट्रेशन मिळणेसाठी दाखल केलेला आहे.

६. सदरहु अर्जाला अनुषंगून अर्जदार यांनी दाखल केलेल्या 2022(3) All MR 189, Balasaheb Dattoba Pawar Vs. Lalasaheb Dattoba Pawar मधील न्यायनिर्णयाचे अवलोकन केले. त्यामध्ये Succession Act (1925), Ss.295,283,273 Civil P.C. (1908), S.9- Probate proceedings- Scope of inquiry- Probate court enquires about factum of Will-Not about title of willed properties – Question of title is decided by Civil court only.

७. ति-हाईत इसम यांनी देखील नामदार सर्वोच्च न्यायालय यांचा 2004 STPL 11549 SC हा न्यायनिर्णय सादर केलेला आहे. त्यामध्ये देखील मृत्यूपत्रात नमूद केलेल्या मिळकती संदर्भात व मालकी हक्काबाबत वाद असतील तर स्वतंत्र दावा दाखल करावा लागतो असे नमूद करण्यात आलेले आहे.

८. नामदार मुंबई उच्च न्यायालयाच्या आदेशामध्ये स्पष्टपणे मृत्यूपत्रावरुन प्रोबेट अगर लेटर ऑफ अ‍ॅडमिनिस्ट्रेशन देत असताना मृत्यूपत्र करणारी व्यक्तीने मृत्यूपत्र हे योग्य पध्दतीने केलेले होते व त्याची शारिरीक व मानसिक स्थिती उत्तम असताना करण्यात आलेले होते इतकी मर्यादीत बाबच अर्जदार यांनी शाबीत करणे अपेक्षीत आहे असे नमूद केलेले आहे. जर मृत्यूपत्रात नमूद केलेल्या मिळकतीच्या मालकी संदर्भात काही तक्रारी असतील तर त्या संदर्भात स्वतंत्र दिवाणी दावा दाखल करणे गरजेचे आहे असे स्पष्टपणे नमूद करण्यात आलेले आहे.

९. प्रस्तुत ति-हाईत इसम यांची तथाकथीत मृत्यूपत्रात नमूद केलेल्या मिळकती संदर्भात व त्यांच्या हक्कांसंदर्भात तक्रार आहे असे अर्जावरुन स्पष्टपणे दिसून येते. त्यामुळे ति-हाईत इसम यांनी अशा प्रकारे त्यांना अर्जामध्ये जाबदार म्हणून सामील करुन न मागता त्यांनी दावा करणे कायदयाला अभिप्रेत आहे असे दिसून येते. सबब ति-हाईत इसम यांचा त्यांना अर्जाचे कामी सामनेवालापणात सामील करुन घेण्याचा अर्ज फेटाळणे क्रमप्राप्त ठरते. सबब खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहे.

## <u>आदेश</u>

१. ति–हाईत इसम यांचा नि.क्र.३० कडील अर्ज खर्चासह नामंजूर करण्यात येत आहे.

२. सदर हुकूमाची नोंद अर्जदार, ति–हाईत इसम व त्यांचे वकील यांनी घ्यावी.

Abhay Ashok Mehendale

Digitally signed by Abhay Ashok Mehendale
Date: 2022.07.08 10:49:30 +0530

**सांगली.** **( ए. ए. मेहेंदळे )**

**दिनांक–०७/०७/२०२२** **दुसरे सह दिवाणी न्यायाधीश व. स्तर, सांगली.**

**<u>प्र मा ण प त्र</u>**

मी खात्रीपुर्वक सांगतो की, सदरहु पी. डी. एफ. फाईलमधील सर्व मजकूर मुळ आदेशाप्रमाणे शब्द नि शब्द बरोबर आहे.

| | | |
|---|---|---|
| लघुलेखकाचे नाव | - | सतिश कृष्णा पाटील, |
| कोर्टाचे नाव | - | दुसरे सह दिवाणी न्यायालय व. स्तर, सांगली. |
| आदेश घोषीत दिनांक | - | ०७/०७/२०२२ |
| पी. डी. एफ चा दिनांक | - | ०८/०७/२०२२ |

( सतिश कृ. पाटील )
लघुलेखक ग्रेड II